साखर उद्योगासमोरील समस्यांसंदर्भात मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन यांच्या अध्यतेखाली समिती गठीत करण्याबाबत.

**महाराष्ट्र शासन**
**सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग,**
**शासन निर्णय क्रमांक :- ससाका- ०२२६ /प्र.क्र.३३ /२५-स,**
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय विस्तार, मुंबई- ४०० ०३२.
दिनांक :-२४/०४/२०२६

**प्रस्तावना :-**

मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांच्या अध्यक्षतेखाली दि.२४/०३/२०२६ रोजी दुपारी १.०० वाजता मंत्रीमंडळ सभागृह, विधान भवन, मुंबई येथे साखर उद्योग प्रश्नांवर चर्चा करण्यासाठी बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीत मा. मुख्यमंत्री महोदयांनी दिलेल्या निर्देशांनुसार साखर उद्योगासमोर असणाऱ्या विविध समस्यांवर उपाययोजना सुचविण्याकरिता मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन यांच्या अध्यक्षतेखाली अपर मुख्य सचिव (वित्त), अपर मुख्य सचिव (कृषि), अपर मुख्य सचिव (उर्जा), प्रधान सचिव (सहकार व पणन), प्रधान सचिव (उद्योग), व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य सहकारी बँक, सहकार आयुक्त, पुणे व साखर आयुक्त, पुणे यांची समिती गठीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे.

**शासन निर्णय :-**

मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांच्या अध्यक्षतेखाली साखर उद्योग प्रश्नासंदर्भात दि.२४/०३/२०२६ रोजी झालेल्या बैठकीत मा. मुख्यमंत्री महोदयांनी साखर उद्योगासमोर असणाऱ्या विविध समस्यांवर उपाययोजना सुचविण्यासाठी मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्याचे निर्देश दिले आहेत. या समितीने राज्यातील साखर उद्योगासमोर असलेल्या विविध अडचणी आणि गाळप हंगाम २०२६-२०२७ सुरू करण्याकरीता करावयाच्या आवश्यक उपाययोजना यासंदर्भात साखर कारखान्यांच्या वतीने महाराष्ट्र राज्य साखर संघाने केलेल्या मागण्यांबाबत विचार करणे अपेक्षित आहे. मा.मुख्यमंत्री महोदयांच्या निदेशांच्या अनुषंगाने मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन यांचे अध्यक्षतेखाली समिती गठित करण्यास शासनाची मान्यता देण्यात येत असून या समितीची रचना खालील प्रमाणे असेल:-

| | | |
|---|---|---|
| १) | मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन | अध्यक्ष |
| २) | अपर मुख्य सचिव, (वित्त) | सदस्य |
| ३) | अपर मुख्य सचिव, (कृषि) | सदस्य |
| ४) | अपर मुख्य सचिव, (उर्जा) | सदस्य |
| ५) | प्रधान सचिव (उद्योग) | सदस्य |
| ६) | प्रधान सचिव, (सहकार व पणन) | सदस्य |
| ७) | व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य सहकारी बँक | सदस्य |
| ८) | सहकार आयुक्त, पुणे | सदस्य |
| ९) | साखर आयुक्त, पुणे | सदस्य सचिव |

उपरोक्त गठित समितीने राज्यातील साखर उद्योगासमोर असणाऱ्या विविध अडचणी, समस्यांचे स्वरूप, त्यांच्या निराकरणाचे उपाय, पर्यायी व्यवस्था याबाबत अभ्यास करून शासनास अहवाल सादर करावा.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक क्र. २०२६०४२४१२३८५६२७०२ असा आहे. सदर शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून निर्गमित करण्यात येत आहे.

**महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,**

ANKUSH PANDURANG SHINGADE

Digitally signed by ANKUSH PANDURANG SHINGADE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=CMTD, 2.5.4.20=0619305C0A0825664EFA457FFA51C3F2364841C81F8C437078A333B7111446A2, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=E11F71FCAC231B0F91F430636DE14F6C49B569D173346155B9208DCD97DD078B, cn=ANKUSH PANDURANG SHINGADE
Date: 2026.04.24 12:39:44 +05'30'

**(अंकुश पां. शिंगाडे)**
**सह सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत :-**

१) मा. मुख्यमंत्री महोदयांचे अपर मुख्य सचिव/ प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
२) मा. उप मुख्यमंत्री (नगरविकास व गृहनिर्माण) यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
३) मा. उप मुख्यमंत्री (राज्य उत्पादन शुल्क) यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई.
४) मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन
५) अपर मुख्य सचिव (वित्त), मंत्रालय, मुंबई.
६) अपर मुख्य सचिव (ऊर्जा), मंत्रालय, मुंबई.
७) अपर मुख्य सचिव (कृषी), मंत्रालय, मुंबई.
८) प्रधान सचिव (उद्योग), मंत्रालय, मुंबई.
८) व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य सहकारी बँक
९) प्रधान सचिव (सहकार व पणन), सहकार,पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
१०) सहकार आयुक्त, पुणे
११) साखर आयुक्त,पुणे,
१२) सह सचिव, (साखर) सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई.
१३) निवड नस्ती २५-स